# पदवीचे वर्ग आजपासून भरणार

## महाविद्यालयात स्वागताची तयारी : विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध विद्याशाखांची महाविद्यालयांमधील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांची महाविद्यालये आज, सोमवारपासून भरणार आहेत. काही महाविद्यालयांतील प्राचार्य, शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या स्वागताची तयारी केली आहे.

पहिल्यांदा इयत्ता नववी ते बारावीचे वर्ग भरले. त्यानंतर इयत्ता पाचवी ते आठवीचे वर्गांनंतर आता पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे वर्ग भरविण्यास राज्य शासनाने परवानगी दिली आहे. त्यानुसार विद्यापीठाने कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील संलग्नित २९३ महाविद्यालयांना आणि विद्यापीठातील ३९ अधिविभागांना कोरोनाबाबतच्या नियमांचे पालन करून वर्ग सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यानुसार महाविद्यालयांनी परिसराचे निर्जंतुकीकरण, स्वच्छता केली. प्रत्येक दिवशी वर्गात ५० टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

### दुसऱ्या टप्प्यात वसतिगृह

कोरोनाच्या संस्थात्मक अलगीकरण, केअर सेंटरसाठी विद्यापीठासह कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील विविध शैक्षणिक संस्थांची वसतिगृहे तेथील प्रशासनाने ताब्यात घेतली होती. प्रशासनाने त्यातील बहुतांश संस्थांच्या ताब्यात पुन्हा वसतिगृहे दिली आहेत. मात्र, त्यांची स्वच्छता करावी लागणार आहे. त्यामुळे सध्या पहिल्या टप्प्यात वर्ग भरविण्याचे आणि महिनाअखेरपर्यंत दुसऱ्या टप्प्यात वसतिगृहे सुरु करण्याचे नियोजन आहे.

# शाहू महाविद्यालयात कार्यशाळा

कोल्हापूर : रयत शिक्षण संस्थेच्या राजर्षी शाहू महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या नवीन बदललेल्या अभ्यासक्रमांवर एकदिवसीय ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन केले होते. यामध्ये शिवाजी विद्यापीठ रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. जी. एस. गोकावी यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्‌घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एस. टी. साळुंखे होते. प्रा. डॉ. डी. एच. दगडे, प्रा. डॉ. जी. बी. कोळेकर यांनी मार्गदर्शन केले.

# शिवाजी विद्यापीठ जगात अग्रेसर व्हावे

## एन. जे. पवार : गडहिंग्लजमध्ये 'रवळनाथ-ज्ञानदीप'तर्फे कुलगुरूंचा सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज** : छत्रपती शिवाजी महाराज हे महापराक्रमी योद्धे होते. नावातच ऊर्जा असणाऱ्या योद्धयाचे नाव लाभलेले शिवाजी विद्यापीठ जगातील पहिल्या ५० विद्यापीठांच्या यादीत यावे आणि जगभरात अग्रसेर ठरावे, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. एन. जे. पवार यांनी व्यक्त केली. गडहिंग्लज येथे श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीचे सभासद, नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या सत्कारप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. भारती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष आनंदराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिर्के म्हणाले, रवळनाथच्या सत्काराने विद्यापीठाच्या विकासाला बळ मिळाले आहे. पाटील म्हणाले, चौगुले यांची दूरदृष्टी व गुणग्राहकता यामुळेच 'रवळनाथ'ची चौफेर प्रगती झाली आहे.




गडहिंग्लज येथे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डी. टी. शिर्के यांचा डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरु एन. जे. पवार यांच्याहस्ते सत्कार झाला. यावेळी प्र. कुलगुरु पी. एस. पाटील, एम. एल. चौगुले, आनंदराव पाटील, मीना रिंगणे उपस्थित होते.

यावेळी बालवैज्ञानिक अथर्व कदम याच्यासह 'ज्ञानदीप'चे देणगीदार विजय आरबोळे, सोनाबाई पाटील, अनंत मायदेव, काशीबाई चौगुले, उमा तोरगल्ली, विजयकुमार घुगरे, रेखा पोतदार, एस. एन. देसाई, मारुती दळवी, शंकर कांबळे, शरद टोपले, भैरू वालीकर यांचाही सत्कार झाला.कार्यक्रमास डी. आर. मोरे, एच. व्ही. देशपांडे, जे. बी. बारर्देस्कर, ए. एम. गुरव, दत्ता पाटील, मंगलकुमार पाटील, एस. डी. कदम, सुरेश चव्हाण, अशोक सादळे, डी. के. मायदेव उपस्थित होते.संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविक, तर मीना रिंगणे यांनी स्वागत केले.

### संताजी आणि धनाजी

कोल्हापूरचे भूमिपुत्र असणारे शिर्के व पाटील हे बौद्धिक क्षेत्रातील संताजी व धनाजी आहेत. त्यांच्या कारकिर्दीत विद्यापीठाच्या नावलौकिकात नक्कीच भर पडेल, असा विश्वास कुलगुरू पवार यांनी व्यक्त केला.

# महाविद्यालये, विद्यापीठातील अधिविभाग आजपासून होणार सुरू

## शिवाजी विद्यापीठाची तयारी पूर्ण; वसतिगृह लवकरच सुरू होणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाविद्यालये, विद्यापीठातील अधिविभाग सोमवारपासून (दि. १५) सुरू होणार आहेत. त्यामुळे एक वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर महाविद्यालय परिसर गजबजणार आहेत. शिवाजी विद्यापीठ तसेच कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांकडून तयारी पूर्ण झाली आहे. कोरोनामुळे मार्च २०२० पासून महाविद्यालये, विद्यापीठातील अधिविभाग बंद होते. राज्य सरकारने महाविद्यालये १५ फेब्रुवारीपासून ५० टक्के विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत रोटेशननुसार सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. शिवाजी विद्यापीठ विद्या परिषद, व्यवस्थापन परिषदेने महाविद्यालये सुरू करण्यास मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने विद्यापीठाने संलग्नित महाविद्यालये, अधिविभागांना मार्गदर्शक सूचनांचे परिपत्रक काढले आहे.



**शिवाजी विद्यापीठातून...**

विद्यापीठात विद्यार्थी, विद्यार्थिनी सहा वसतिगृह व तंत्रज्ञान अधिविभागाची दोन वसतिगृह आहेत. महापालिकेने गेल्या आठवड्यात वसतिगृह विद्यापीठास ताब्यात दिली आहेत. काही वसतिगृहांचे सॅनिटायझेशन, स्वच्छता पूर्ण झाली आहे. संलग्नित महाविद्यालयांकडूनही तयारी पूर्ण झाली आहे. कोव्हिड सेंटर म्हणून दिलेल्या वसतिगृहांची स्वच्छता सुरू आहे. वसतिगृह इलेक्ट्रिक व फायर ऑडिटचे काम हाती घेण्यात आले आहे. वसतिगृहात येताना विद्यार्थ्यांना शासन निर्देश मास्क, सॅनिटायझर वापरणे बंधनकारक असणार आहे. ५० टक्के उपस्थितीनुसार एका रूममध्ये एकच विद्यार्थी ठेवण्यात येणार आहे. येत्या काही दिवसांत विद्यापीठातील वसतिगृह सुरू होतील, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ वसतिगृहाचे चीफ रेक्टर डॉ. एस. पी. हंगिरगेकर यांनी दिली.

> यूजीसी व राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार महाविद्यालये सुरू करण्याबाबत विद्यापीठाने परिपत्रक काढून सूचना दिल्या आहेत. सोमवारपासून ५० टक्के विद्यार्थी उपस्थितीत महाविद्यालये, विद्यापीठातील अधिविभाग सुरू होण्यास हरकत नाही. विद्यापीठ प्रशासनाकडून तयारी पूर्ण झाली आहे.
>
> **डॉ. डी. टी. शिर्के,**
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

# शाहू महाविद्यालयात ऑनलाईन कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १४ : राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या सीबीसीएस पॅटर्ननुसार बदलेल्या अभ्यासक्रमानुसार आधारित बीएसस्सी भाग तीन भौतिकशास्त्र विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय ऑनलाईन कार्यशाळा झाली. उद्‌घाटन व बीजभाषण अभ्यास मंडळाचे अध्यक्ष व शिवाजी विद्यापीठाचे भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. के. वाय. राजपुरे यांनी केले. प्रा. डॉ. यू. के. मोहिते, प्रा. डॉ. व्ही. व्ही. किल्लेदार, प्रा. डॉ. टी. डे. शिंदे, प्रा. डॉ. जे. बी. थोरात यांनी मार्गदर्शन केले.

# महाविद्यालयांना आजपासून प्रारंभ

## स्वागताची जय्यत तयारी; ५० टक्केच उपस्थिती

कोल्हापूर, ता. १४ : कोरोनामुळे अकरा महिने बंद असणारी महाविद्यालये उद्या (ता. १५) पासून सुरू होणार आहेत. यासाठी महाविद्यालयांनी जय्यत तयारी केली आहे. वर्गांच्या निर्जंतुकीकरणाबरोबरच विद्यार्थ्यांचे स्वागतही केले जाणार आहे. अकरा महिन्यांपासून शांत असणारा महाविद्यालयांचा परिसर पुन्हा एकदा तरुणाईच्या उत्साहाने फुलणार आहे.

कोरोनाचा सर्वाधिक परिणाम शिक्षण क्षेत्रावर झाला. राज्याचे शैक्षणिक वेळापत्रकच बिघडले. एरवी जुलै, ऑगस्टमध्ये सुरू होणारी महाविद्यालये उद्या (ता.१५) पासून सुरू होत आहे. विद्यापीठ अनुदान आयोग (यु.जी.सी.) आणि शिवाजी विद्यापीठाने गठित केलेल्या समितीच्या अहवालातील सूचनांप्रमाणे महाविद्यालयांनी तयारी केली आहे.

यासाठी महाविद्यालयांनी कर्मचाऱ्यांची बैठक घेतली. प्रत्येकाला निर्जंतुकीकरणाचे प्रशिक्षण दिले, तसेच वर्गही नेमून देण्यात आले. काही महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या स्वागताचीही तयारी केली आहे. नियमाप्रमाणे ५० टक्केच विद्यार्थी वर्गात येणार आहेत. त्यामुळे एका विद्यार्थ्याला महिन्याचे पंधरा दिवसच महाविद्यालयात येण्याची संधी मिळणार आहे. सोशल डिस्टन्सिंगचे पालन करून अध्यापन करायचे आहे. त्यामुळे एका बाकावर एकच विद्यार्थी या पद्धतीने बैठक व्यवस्था केली. गेले अकरा महिने बंद असणारी महाविद्यालये पुन्हा सुरू होणार आहेत.

# महाविद्यालये आज सुरू होणार

प्रतिनिधी
कोल्हापूर



- युजीसी आणि शासन निर्णयानुसार महाविद्यालयांची तयारी
- नियमित प्राध्यापकांवर अभ्यासक्रमाचा भार
- सीएचबी प्राध्यापकांना त्वरित नियुक्तीपत्र देण्याची मागणी

राज्य शासन आणि युजीसीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करीत आजपासून महाविद्यालये सुरू होणार आहेत. त्यामुळे महाविद्यालयांनीही वर्गखोल्यांचे सॅनिटायझेशन केले आहे. तसेच वर्गात येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांची स्क्रिनिंग तपासणी केली जाणार आहे. मास्क न घालणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्गात प्रवेश दिला जाणार नाही. एकूणच महाविद्यालये सुरू करण्याची पूर्ण तयारी महाविद्यालय प्रशासनाने केली आहे.

डॉ. डी. जी. कणसे समितीने दिलेल्या अहवालानुसार महाविद्यालय सुरू करण्यास विद्या परिषद व व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.

पान ७ पहा

# महाविद्यालये आज सुरू होणार

पान १ वरून

त्यानंतर विद्यापीठाने परिपत्रक काढून महाविद्यालये सुरू करण्याच्या सूचना तिन्ही जिल्ह्यातील २९० महाविद्यालयांना परिपत्रकाव्दारे दिल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या रोलनंबरप्रमाणे विद्यार्थ्यांना बसण्याची व्यवस्था केली जाणार आहे.

तब्बल आठ महिन्यानंतर महाविद्यालय फुलुन जाणार असल्याने महाविद्यालयात जाण्याची संधी मिळणार म्हणून विद्यार्थ्यांमध्येही उत्सुकता आहे. वसतिगृहांच्या खोल्यांचीही स्वच्छता व सॅनिटायझेशन केले आहे.

रोलनंबरनुसार एकदिवसाआड एक ५० टक्के विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश दिला जाणार आहे. तसे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य जपण्यासाठी नियमांचे पालन केले जाणार आहे.

## अध्यापनाचा भार ४० टक्के प्राध्यापकांवर

महाविद्याय सुरू करण्याचा निर्णय झाला. गतवर्षीच्या सीएचबी प्राध्यापकांची नियुक्ती करण्यास उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी मान्यता दिली आहे. यामध्ये काही कालावधी जाणार आहे. त्यामुळे तुर्तास ४० टक्के नियमित प्राध्यापकांवर अध्यापनाचा भार पडणार आहे. २० टक्के अभ्यासक्रम कमी केला असला तरी ६० टक्के सीएचबी प्राध्यापकांची त्वरीत नियुक्ती करावी.

**डॉ. क्रांतिकुमार पाटील** (अध्यक्ष, कोल्हापूर जिल्हा प्राचार्य असोसिएशन)

# राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमध्ये भौतिकशास्त्र कार्यशाळा

**कोल्हापूर :** राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमध्ये भौतिकशास्त्र तृतीय वर्षसाठी ऑनलाईन कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठ भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजपुरे यांच्या हस्ते झाले. प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे यांनी स्वागत केले. प्रा. किल्लेदार यांनी प्रास्ताविक केले. कार्यशाळेत डॉ. यु. के. मोहिते, डॉ. किल्लेदार, डॉ. टी. जे. शिंदे, डॉ. जे. बी. थोरात यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. अर्चना पाटील, डॉ. टी. एस. कुरणे, डी. ए. माळवेकर, अनिकेत जाधव आदी उपस्थित होते.

# ‘रवळनाथ ’च्या सत्काराने नवी ऊर्जा

## कुलगुरू डॉ. शिर्के; गडहिंग्लजमध्ये सत्कार

**गडहिंग्लज** : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी निवड झाल्यानंतर गडहिंग्लज येथील रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी व ज्ञानदीप प्रबोधिनी यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. या सत्काराने काम करण्यासाठी नवी ऊर्जा मिळाली आहे. त्याचबरोबर जबाबदारीचे नवे भान आणि विद्यापीठाच्या विकासाला नवे बळ मिळाल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

गडहिंग्लज येथील रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी व ज्ञानदीप प्रबोधिनीतर्फे आयोजित सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू व डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. जे. पवार होते. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के व प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा गौरव करण्यात आला. भारती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष आनंदराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. रवळनाथ हौसिंग फायनान्स व ज्ञानदीप प्रबोधिनीचे संस्थापक डॉ. एम. एल. चौगले यांनी प्रास्ताविक केले. झेप अॅकॅडमीच्या प्राचार्या मीना रिंगणे यांनी स्वागत केले. प्रा. विजय आरबोळे, सोनाबाई पाटील, अनंत मायदेव, काशीबाई चौगुले, उमा तोरगल्ले, विजयकुमार घुगरे, रेखा पोतदार, प्राचार्य एस. एन. देसाई, मारुती दळवी, शंकर कांबळे, शरद टोपले, भैरू वालीकर यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बीसीयूडीचे माजी संचालक प्राचार्य डी. आर. मोरे, प्राचार्य डॉ. एच. व्ही. देशपांडे, प्राचार्य जे. बी. बारदेस्कर, प्रा. डॉ. ए. एम गुरव, ज्ञानदीपचे कार्याध्यक्ष प्रा. दत्ता पाटील, प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील, डी. के. मायदेव, सागर माने, बाबासाो मार्तंड यांच्यासह संचालक, सल्लागार व कर्मचारी उपस्थित होते.



**प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा गौरव करताना डॉ. एन. जे. पवार. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले, प्राचार्या मीना रिंगणे, आनंदराव पाटील.**

मुंबई वगळता राज्यातील

# विद्यापीठ, महाविद्यालये आजपासून गजबजणार !

## ५ मार्चपर्यंत ५० टक्के उपस्थिती राहणार



मुंबई : राज्यात कोरोना आटोक्यात आल्याने सोमवार, १५ फेब्रुवारीपासून तब्बल ११ महिन्यांनंतर मुंबईवगळता राज्यातील विद्यापीठे आणि वरिष्ठ महाविद्यालये सुरू होणार आहेत. त्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षकांनी महाविद्यालयांचा परिसर गजबजणार आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पहिल्या टप्प्यात ५ मार्चपर्यंत ५० टक्के उपस्थिती राहणार आहे.

▶▶ पान ९ वर..

## विद्यापीठ, महाविद्यालये आजपासूनगजबजणार!

राज्यातील विद्यापीठ आणि महाविद्यालय सुरू करण्यासंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी ३ फेब्रुवारी रोजी घोषणा केली होती. यावेळी कोरोनाची स्थिती लक्षात घेऊन मुंबई, ठाणे, नवी मुंबई परिसरात महाविद्यालये बंद राहणार असल्याचे जाहीर करण्यात आले. त्यामुळे मुंबई आणि परिसर वगळता राज्यातील उर्वरित सर्व जिल्ह्यांमधील वरिष्ठ महाविद्यालये, विद्यापीठे यांचा कारभार १५ फेब्रुवारीपासून सुरू होत आहे.

कोरोना आटोक्यात आला असला तरी धोका अद्याप टळलेला नाही. ही बाब लक्षात घेऊन सोशल डिस्टन्सिंगचा नियम पाळणे बंधनकारक आहे. महाविद्यालये सुरू करताना प्रत्येक महाविद्यालयामध्ये ५० टक्के उपस्थिती ठेवली जाणार असून, स्थानिक स्तरावर धोरणाचा आढावा घेऊन ही उपस्थिती वाढवण्याचा अधिकार संबंधित विद्यापीठ आणि स्थानिक प्रशासनाला देण्यात आले आहेत.

मुंबई आणि परिसरात शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, विद्यापीठ आणि वरिष्ठ महाविद्यालये बंदच राहणार आहेत. यासंदर्भात कोणताही निर्णय घेण्यात आला नसल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. तर मुंबई आणि परिसरातल्या शाळातील ऑनलाइन शिकवण्या मात्र सुरू राहणार आहेत. या शिकवण्या कुठेही प्रत्यक्षात सुरू केल्या जाणार नाहीत, अशी माहिती महापालिका शिक्षण अधिकारी महेश पालकर यांनी दिली.

### पहिल्या टप्प्यात ५ मार्चपर्यंत ५० टक्के उपस्थिती

राज्यातील विद्यापीठ आणि सर्व महाविद्यालये सुरू करताना यात पहिल्या टप्प्यात ५ मार्चपर्यंत ५० टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती ठेवता येणार आहे. विद्यार्थ्यांना रोटेशनप्रमाणे बोलवता येईल. विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये यादरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन या दोन्ही प्रकारे घेतल्या जातील. तशी मुभा विद्यार्थ्यांना मिळणार आहे. उपस्थितीसंदर्भात विद्यापीठे आणि स्थानिक प्रशासनाच्या आढाव्यानंतर निर्णय घेतले जातील. याबाबतचे अधिकार विद्यापीठे आणि शिक्षण विभागाला दिले जाणार आहेत.

# भेदिक शाहिरीतून आध्यात्मिक कलगीतुरा

## दोन्ही पक्षांच्या शाहिरांचे कला सादरीकरण; शिवकाळापासून परंपरा

**» जागर लोककलांचा - भाग ८**

संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १४ : कलगीतुरा म्हणजे आध्यात्मिक शाहिरी. कलगी शाहीर शक्ती म्हणजेच पार्वतीचे, तर तुरा पक्षाचे शाहीर शिवशंकराचे उपासक. दोन्ही पक्षांचे शाहीर समोरासमोर काव्याच्या माध्यमातून आध्यात्मिक विषयावर वाद घालतात.

भेदिक शाहिरीचे वैशिष्ट्य म्हणजे ही शाहिरी काव्ये वही, चोपडी यातून लिहिलेली असतात. वेळप्रसंगी या लिखित काव्याचाही सवाल - जवाबासाठी आधार घेतला जातो, असे प्रा. डॉ. नंदकुमार मोरे सांगतात.

कलगीतुऱ्याची आध्यात्मिक शाहिरी करणारे शाहीर शिवकाळात सैनिकांच्या मनोरंजनासाठी ऐतिहासिक पोवाडे व लावण्या रचत होते, असे तमाशा कलेचे व्यासंगी अभ्यासक नामदेव व्हटकर म्हणतात. जुन्या काळी कलगीतुऱ्याच्या सामन्यांना 'आखाड' म्हटले जायचे. कलगी पक्षाचा शाहीर प्रश्नरूप भेदिक लावणी सादर करायचा. त्यास 'चढाची लावणी' म्हणत. तुरा पक्षाचा शाहीर त्याला उत्तर देई. त्यास 'उताराची लावणी' म्हटले जाते. दोहोंपैकी कुठला तरी एक पक्ष निरुत्तर होईपर्यंत हा आखाडा चालत असल्याने तो दोन-चार दिवसही चालत असे. प्रा. डॉ. नंदकुमार मोरे म्हणतात, "पेशवेकाळातील अनेक शाहीर कलगीतुरा या निमित्ताने झालेल्या सवाल-जवाबांच्या माध्यमातून पुढे आलेले आहेत. होनाजी बाळा, परशुराम, राम जोशी, शंभूराजू हे शाहीर तुरेवाले म्हणून प्रसिद्ध होते; तर सगनभाऊ, हैबती हे शाहीर कलगीवाले म्हणून प्रसिद्ध होते." पूर्वी दोन किंवा तीन कलाकार ही कला सादर करत असत.

(समाप्त)




### शाहिरीचे वैशिष्ट्य असे :

- भेदिक कूटरचनेत शाहिरांच्या ज्ञानाची कसोटी
- अनेकदा उत्स्फूर्तपणे रचना सादरीकरण
- हरलेल्याचा डफ आणि तुरा हिसकावून घेण्याची प्रथा
- हार - जीत झाल्यानंतर दोन्ही पक्ष मिरवणूक काढायचे
- कलगीवाल्यांचे निशाण भगवे, तर तुरेवाल्यांचे निशाण हिरवे